श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष २ रें. ] माघ शके १८४७ [ अंक ११ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ ट्नेर रोड. बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... [illegible]

स्फुट विषय ... ... ... ... ... [illegible]

श्री साईसच्चरित ... ... ... ... [illegible]


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतु याची छपाई व खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यां-मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत कर-णाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पड-तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु.३।=व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥.

पूर्वीच्या अंकांत व्ही. पो. नें रु. ३॥= चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु.३॥ ची व्ही.पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचे-कडे ज़मा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

श्री साईलीला कर्ते यांस:—सा. न. वि. वि.

श्री समर्थ साईनाथांबद्दलचे अनुभव लिहिणें म्हणजे प्रत्येकानें आपल्या प्रत्येक क्षणाचें निरीक्षण करणें होय. कारण अनुभव येत नाहीं, असा एक क्षणही जात नाहीं. पुढील मजकुरास " श्री साईलीला " मासिकरूपी साईचरणीं यथावकाश स्थान मिळेल अशी आशा आहे.

आमचे वडील आमच्या लहानपणीं निवर्तल्यामुळें माळवण सोडून आम्हांस ठाण्यास यावें लागलें. वडील मारुती उपासक ( रामदासी ) होते. आम्हांस वडिलांचे मागें आमचे आत्यांनी लहानाचे मोठे करून आमचे कडून थोडासा विद्याभ्यास करविला. माझा इंग्रजी अभ्यास थोडा झाल्यानंतर आमचे स्थितीप्रमाणें मला नोकरी धरून धाकटया भावास थोडेंतरी शिक्षण देणें भाग झालें. त्याप्रमाणें मी मुंबईस खटाव मकनजी मीलमध्यें नोकरी पतकरिली व ठाण्यास स्वतःचें बिऱ्हाड केलें.

आमची मातोश्री आमचे वडिलांचे सहवासानें खरी सुशिक्षित बनलेली होती. अलीकडील सुशिक्षित व तार्किक मंडळींचीं कांहीं चुकीचीं ( स्वधर्माबद्दल ) मतें खंडन करण्यांत तिचा हातखंडा असे. सर्व भिकाऱ्यांस ती यथाशक्ति मदत करीत असे. परंतु फकिरांकडे मात्र विशेष आदरदृष्टीनें पहात असे. याचें कारण तिला आम्ही भावंडें वारंवार विचारीत असूं. मी म्हणे हिंदू भिकारी सर्व मेले कीं काय ? तूं फकिराचें काय वेडून खाल्लें आहेस? याबद्दलचा उलगडा तिनें पुढीलप्रमाणें केला तो असा. ती म्हणाली तुझ्या वडिलांस जरी लहानपणापासून विद्येचा नाद असला तरी पण ते ठाणें जिल्ह्यांत गेले असतांना त्यांना एका फकिरानें प्रसाद दिल्यापासून ते आपल्या अल्पवयांतच कीर्ति मिळवून गेले. कीर्तन, ज्योतिष, गायन, सात्विक पंचाक्षरी ( मंत्रविद्या ) विद्या यांचा त्यांना बराच अभ्यास असून वैद्यकींत तर त्यांचा हातखंडा असे. असो.

मी खटाव मकनजी मीलमध्यें असतांना व त्यापूर्वीही श्री साईनाथांची कीर्ति वारंवार ऐकूं येत असल्यामुळें व मी स्वतः फार अशक्त व वारंवार सीक

पडत असल्यामुळें आमचे मातोश्रीचे मनांत मी शिरडीस जाऊन श्रीचरण-स्पर्शानें पुनीत होऊन यावें असें होतें व माझीही तीव्र इच्छा होती. परंतु हे आमचे दरिद्र्याचें मनोरथ 'उत्पद्यंते विलीयंते' असे होत असत. कारण माझा पगार रुपये १५ व शिरडीस जाऊन येण्याचा खर्च रु.१५ आतां हा योग येणें म्हणजे डोंगरानें महमदाकडे चालून जाणें होय असें वाटून मी स्वस्थ बसलों. ठाण्यास एकेवेळीं जिकडे तिकडे उंदीर पडूं लागले याचवेळीं माझ्या धाकट्या बंधूंनां बराच ताप आला. आमचे बिर्‍हाडा समोरच मिशनरी दवाखाना होता व तेथील डॉक्टर फारच कनवाळू व आपल्या विद्येंत पूर्ण पारंगत असत. त्यांचे हाताखालीं एक पार्शी मदत डॉक्टर असून त्यांनींही या डॉक्टरच्या सहवासानें आपली योग्यता लोकांस पटवून प्रीतिसंपादन केली होती. वरील दोन्ही डॉक्टरांस मी आमचे भावांस दाखवून तपासविलें व त्यांनीं हा ताप विषारी, कदाचित् ग्रंथीज्वर, असण्याचा संभव आहे कारण याची मान दुखत आहे म्हणून जपलें पाहिजे इतकें सांगून योग्य औषधयोजना केली व आम्हांस न घाबरण्याविषयीं सांगितलें. घरीं आणून त्याला औषध दिलें. व मी नोकरीवरून रजा घेऊन येतों. म्हणून मातोश्रीस सांगितलें. ती म्हणाली बेलाशक जा. उपचार करणें आपलें काम आहे गुण देणार श्री आहेत. तूं घरीं राहून काय करणार ?

मी मीलमध्यें गेलों तों आमचे म्यानेजर साहेब श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांनां एक पत्र श्रीशिर्डीहून आलें होतें त्यांत येथील बाबांचे विहिरीचा पंप बिघडला आहे कोणी तरी चांगला नीट करणारा धाडून द्या असा मजकूर असल्यामुळें त्याकामीं त्या मीलमध्यें असलेले रा. वामनराव विठोबा इंजिनियर यांची योजना झाली व त्यामुळें हा योग अनायासें आल्यामुळें रा. वामनराव सहकुटुंब जावयास निघाले आमच्या म्यानेजरसाहेबांची मंडळीही शिर्डीस जावयास निघाली कारण शिर्डी म्हणजे त्यांचें माहेरघरच होय.

ही एकंदर मंडळी आज दुपारीं दादर स्टेशनवरून ४ वाजतां सुटणाऱ्या दिल्ली प्यासेंजरनें निघणार असल्यामुळें माझी योजना शिर्डीस नेण्या-

करितां हार व फळफळावळ मार्केटमधून दादर स्टेशनवर पोंहचविण्याकडे झाली होती. त्याप्रमाणें मी नुसत्या सदऱ्या टोपीनिशी ( कोट मिलमध्येंच ठेविला होता ) हार व फळफळावर घेऊन गाडीपूर्वी १५-२० मिनिटें स्टेशनवर हजर झालों. आमचे म्यानेजरसाहेब नुकतेच स्टेशनवर येऊन त्यांच्या जाणाऱ्या एकंदर मंडळीचीं तिकिटें काढून तयार होते. परंतु ऐनवेळी त्यांच्या बांद्राहून येणाऱ्या मंडळीपैकीं एकाचा बेत रहित झाला व एक तिकिट शिल्लक राहिलें. गाडी स्टेशनांत आली, सर्व मंडळी गाडींत बसली. सर्वजणांस दर्शनलाभ होणार. ते मोठे भाग्यवान आहेत मी फार अभागी आहें असा विचार मनांत येऊन मी त्या जाणाऱ्या मंडळीस नमस्कार करतों आहे इतक्यांत पुढील शब्द माझ्या कानीं पडले:—“ पोऱ्या तूं शिर्डीस जातोस का, माझ्याकडे तिकीट शिल्लक आहे. ”

हे शब्द आमच्या म्यानेजर साहेबांचे होते. ते ऐकून मला स्वतःचें भान राहिलें नाहीं. मी स्वर्गांत आहे असा भास झाला. डोळे आनंदाश्रूंनी भरून आले व त्या भरांत माझा भाऊ घरीं अत्यवस्थ आहे या आठवणीवर जणूं बाबांनीं आपल्या मायेचें पूर्ण अच्छादन घातल्यामुळें मी भान न राहतां-हो,जातों. म्हणून जबाब देऊन मी गेलों असा माझ्या घरीं निरोप पाठविण्या-बद्दल आमचे म्यानेजरसाहेबांस सांगून त्यांचे कडून परत येईपर्यंतची रजा घेऊन गाडींत बसलों व गाडी चालू झाली.

दादर स्टेशन सुटलें व माझे मनावर भावाचे सीकपणाचे काळजीचे आघात सुरु झाले; तावडतोब मातोश्रीचे शब्दांची आठवण झाली ती म्हणाली होती कीं तूं अधिक काय करणार गूण देणार श्रीसमर्थ आहेत या वचनाचे प्रत्याघातास सुरवात झाली. काय करावें ? जावें कीं ठाण्यास उतरावें हें सुचेना. इतक्यांत ठाण्याचे एक इसम गाडींत भेटले. त्यांचे पाशीं सर्व हकीगत थोडक्यांत सांगून आमचे मातोश्रीकडे मी गेल्याचा निरोप पोंचविण्यास सांगितलें. व गाडी ठाणें स्टेशनांत येऊन सुटली.

इकडे ठाण्यास रात्रौ ८ वाजतां मी शिर्डीस गेल्याचा निरोप मातो-श्रीस समजला, तिला मी गेल्याबद्दल अत्यानंद झाला. रात्रौं तिला सुखस्वप्नें

पडूं लागली की आपल्या मुलास उद्यां पासून खात्रीनें गुण पडेल. कारण मी दुसरे दिवशीं शिर्डीस पोंचणार होतों. व त्याप्रमाणें झालेंही. दुसऱ्या दिवसापासून आमच्या बंधूस थोडथोडा आराम पडावयास सुरवात झाली.

रात्रौ २ वाजतां आमची गाडी मनमाडास पोहोंचली. तेथें बदली करून दौंडमनमाड रेल्वेनें दुसऱ्या दिवशीं ७-७॥ चे सुमारास कोपरगांव स्टेशनवर उतरलों व टांग्यांतून कोपरगांव गावांत जाऊन तेथें श्रीगोदा-माईचें स्नान करून पुढें टांग्यांतून सुमारें ११ वाजतां श्रीशिर्डीस पोंहोंचलों.

गावांतील एका वाड्यांत ( बहुतकरून हा वाडा श्री. दीक्षित यांचा असावा ) आमचे बरोबरचे मंडळीनें बिऱ्हाड लावलें. ( माझें स्वतःचें बिऱ्हाड म्हणजे माझें शरीर सदरा, टोपी, व नेसलेलें धोतर फक्त. ) नंतर लगेच आरतीचा वेळ झाल्यामुळें श्रीमशिदींत गेलों. श्रींची स्वारी आसनाधिष्ठित असून पूजा चालू होती. यावेळीं मला आम्ही सर्व कैलासांत श्री शंकराचे समोर उभे आहोंत असा भास झाला. भास नव्हेतर बाबांचे चेहऱ्यावर मी श्रीरामचंद्राचे स्वरूपाचा आरोप करून पाहूं लागलों तों ते प्रत्यक्ष शंकरच आहेत असें मला जास्त खात्रीशीर वाटूं लागलें. असो.

माझे सोबतचे मंडळीनें नेलेला हार शेरा फळफळावळ यांचा श्रींनीं सहेतुक व आनंदीदृष्टीनें स्वीकार करून आरती आटपल्यावर प्रसाद व उदी घेऊन आम्हास वाड्यांत जाण्यास आज्ञा झाली. त्याप्रमाणें आम्ही गेलों.

दुपारीं २-२॥ चे सुमारास आम्ही पुन्हा बाबांचे दर्शनास मशिदींत गेलों. नमस्कार वगैरे केल्यानंतर प्रथम आमच्या म्यानेजर साहेबांचे चिरंजीवांनीं श्रींना ( बहुत करून १० रुपये असावेत ) दक्षणा दिली. महाराजांनीं ते घेऊन माझे ३० तीस रुपये दे असें सांगितलें. आमच्या म्यानेजर साहेबांनीं मंडळी निघाल्यानंतर त्यांना खर्चास वगैरे रक्कम दिल्यानंतर कदाचित् दक्षणेकरितां म्हणून जास्त पैसा असावा म्हणून पुन्हा ३० तीस रुपये निराळे दिल्याचें समजलें. हा ठोकताळा समजल्याबरोबर माझी मनःस्थिती काय झाली असले याचा वाचकांनींच विचार करावा.

आम्हाला श्रीनीं दोन आठवडे ठेवून घेतलें. हे दोन आठवडे २ दिवसाप्रमाणें निघून गेले. महाराज मजपाशीं रोज दक्षणा मागत. मला येण्या खर्चाकरितां म्हणून आमच्या म्यानेजरसाहेबांनीं दहा रुपये देऊन ठेविले होते. श्रीनीं दक्षणा मागितल्यानंतर मी त्यांपैकीं १ रुपया ठेवीत असें.

एके दिवशीं महाराजांनीं मजपासी ४ पावल्या दक्षणा मागितली. मी एक रुपया पुढें ठेविला. मला रुपया नको पावल्या पाहिजेत म्हणून सांगितलें. मी रुपया घेऊन सर्व गांवांत हिंडलों परंतु मला ४ पावल्या मिळेनात. शेवटीं १-१॥ तासानें एकदांच्या मिळाल्या त्या आणून श्रीचे चरणीं समर्पण केल्या.

आम्ही शिर्डीस जातों ते दर्शन घेऊन परत येतों. शिर्डी हें क्षेत्र आहे म्हणून त्या ठिकाणीं श्रींचा अवतार प्रकट झाला असें असतां नुसतें दर्शन घेऊन न जातां क्षेत्राची नगर प्रदक्षणा झाली पाहिजे असा जो संतजनांचा प्रघात त्याची अंमल बजावणी मजकडून श्रींनी करविली असी माझी खात्री झाली.

मी प्रथम लिहिल्याप्रमाणें महाराजांचें व्यापकत्व क्षणोक्षणीं गोचर होत असे. एके दिवशीं एका भक्तनें मला मोठा चिवूड महाराजांसमोर ठेविला. महाराजांकडून तावडतोब कापण्याची आज्ञा झाली व स्वतःवाटण्याची सुरवात केली. मी सर्वांचें मागें महाराजांचे दृष्टीआड मुद्दाम बसलों होतों म्हटलें तरी चालेल. माझ्या पुढें बरीच गर्दी होती पण महाराजांनीं एक तुकडा इतक्या उंचीवरून व जोरानें माझ्या अंगावर फेंकला कीं, माझे चांगलीच तोंडांत बसली. मनांत काय समजावयाचें तें मी समजलों.

एके दिवशीं आम्हीं महाराजांचे सान्निध्यांत असतां माझे मनांत एकाएकीं महाराज मला मारुती उपासना देतील तर बरें होईल कारण आमची परंपरा तशी आहे" असें आलें. ही गोष्ट माझ्या मनांत येते न येते तोंच महाराज माझे शेजारचे मनुष्यास म्हणाले अल्ला अच्छा करेगा राम राम म्हण. मी खुणगांठ जाणली व पुढें कांही दिवसांनीं ठाण्यास आमचे शेजारचे श्री समर्थ चौंडे महाराज यांचा मुक्काम (हे बरेच महिने.

होते रोज कीर्तन प्रवचन सुरू असे ) येऊन माझे इच्छेप्रमाणें तथा श्रींचे सुचनें प्रमाणें राम उपासना मिळाली व मला अत्यानंद झाला.

एके दिवशीं आम्ही कांहीं मंडळी दुपारचे २ वाजण्याचे सुमारास मशिदींत बसलों होतों उन्हाळा फारच जाणवूं लागला कांहीं मंडळी वाड्यांत गेली. कांहीना श्रीनीं कोठें कोठें जाण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें कोणी श्री भागवत वाचण्यास कोणी ऐकण्यास निघून गेले. मला उष्मा सहन होत नस- त्यामुळें या लॉटरींत आपणही जावें असें वाटून मी उठलों तोंच महाराज आम्हा ४।५ मंडळीस थांबवून म्हणाले तुम्ही जाऊं नका येथेंच बसा. आज्ञेप्रमाणें आम्ही ४।५ मंडळी बसलों. थोडयाच वेळांत महाराजांनी आम्हांस धुनीमध्यें विस्तव प्रज्वलित करण्यांस सांगितलें त्याप्रमाणें आम्ही केलें इतकेंच नव्हे तर आपण स्वतः आम्हास बरोबर घेऊन धुनीजवळ बसले. आम्हांस केव्हां उठतों असें झालें. यज्ञाची नसली तरी श्रावणीची तरी आठ- वण झाली. आंगांतून घामाच्या धारा चालल्या. कांहीं केल्या महाराज उठे- नात व त्यांचे आंगास घामाचा लेशही नाहीं हें पाहून आम्हास आश्चर्य वाटलें. घाम आल्या नंतर थोडयाच वेळांत आम्हाला धुनी जवळ असतांना सुद्धां थंडावा वाटूं लागला इतकेंच नव्हे तर पूर्वी होत असलेला उष्मा कमी होऊन मनास आराम व आल्हाद वाटला. तात्पर्य बराच त्रास सहन केल्या शिवाय चांगलें सुख मिळत नाहीं हें श्रीनीं आम्हांस सप्रयोग पटविलें.

एके दिवशीं आरती सुरू असतांना मुंबईहून कांहीं भक्त मंडळी आली त्यांचे बरोबर असलेल्या एका बाईचे जिवास कांहीं पिशाच्च बाधा असे. मंडळीनें बरेच उपाय करून शेवटीं त्या बाईस श्रीशिर्डीस आणलें होतें बाई मशीदी समोरील पटांगणांत आल्या तोंच बेशुद्ध होऊन पडल्या. साधा- रण गडबड झाली. परंतु आरती सुरू असल्यामुळें तिकडे फारसें कोणी लक्ष दिलें नाहीं. बाई स्वस्थ पडून होत्या. पूजा आरती वगैरे आटोपून सर्वांस उदी प्रसाद समर्पण झाले. मंडळी आपआपल्या घरीं जाण्यास निघाली. तरी श्रीबाबा या बाईबद्दल अद्याप कांहीं बोलेनात शेवटीं बहुतेक सर्व मंडळी

ही. ५।१० माणसें होतीं इतक्यांत श्रींनीं त्या बाईना उद्देशून–जाग ए, उठी ऊन वाड्यांत जा–असे शब्द उच्चारले तत्क्षणींच बाई उठल्या व उठी ऊन वाड्यांत गेल्या. आम्ही तेथें असेपर्यंत या बाईचे अंगांत कांही ालें नाहीं. पुढें २।४ दिवसांनी ही मंडळी व आम्ही बरोबरच मुंबईस ालों. या मंडळीचें उपनाव मंत्री असावेसें स्मरतें शक्य असल्यास आपले ढील अनुभव त्यांनीं लीलेंत प्रसिद्ध करावेत.

उद्यां जा,संध्याकाळीं जा म्हणतां म्हणतां श्रींनीं आम्हांस जवळ जवळ २ आठवड्यांनीं जाण्यास परवानगी दिली. इकडे घरीं आमचे बंधूस बराच आराम पडला होता परंतु मजकडून गेल्यापासून पत्र वगैरे नसल्यामुळें आमच्या मातोश्रीस सारखी काळजी लागली होती. रात्रीं झोंप येईना. शेवटीं एका रात्रीं पहाटेस स्वप्नांत एक फकीर आला व त्यानें एक पत्र दिलें त्यांत कांहीं काळजी करूं नको तुझा मुलगा सकाळीं परत येइल असा मजकूर होता. हें स्वप्न जागेपणींच पडलें म्हटलें तरी चालेल. कारण तिनें लगेच माझ्या धाकट्या बंधूंस ही गोष्ट सांगितली व त्याला पत्र देण्याकरितां हात पुढें केला तों पत्र नाहीं. तेव्हां हें स्वप्न ठरून मंडळीला हसूं आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी येऊन दाखल झालों. सर्वांस उदीप्रसाद दिला. आनंदी-आनंद झाला. तेथपासून माझा नेहमींचा सिकपणाही कमीं झाला. आमचे घरीं श्रींचें रामस्वरूपीं ध्यान होऊन ( कारण हीच उपासना पूर्वींपासून सुरू असल्यामुळें–साईरूप धर राघवउत्तम॥ भक्तकाम विबुध द्रुम प्रभुं॥ ही भावना दृढ झाली ) पूजा सुरू झाली व कमजास्त प्रसंगी उदी देण्याचा प्रघात सुरू झाला. त्यापैकीं एक अनुभव देऊन आज रजा घेतों.

आमचे शेजारी रा. दादा खोत या नावांचे एक मूर्तिकार रहात असत. श्री गजाननाच्या मूर्ति करण्यांत अद्याप त्यांचा हातखंडा असे. त्यांच्या मागें तशा मूर्ति झालेल्या पहाण्यांत नाहीत. यांचा मुलगा घनःशाम यांस प्रथम ताप येत असे. प्रथम खासगी औषधें केली ताप जाईना. शेजारी हल्लीचे प्रसिद्ध भागवत डॉक्टर रहात असत

( त्यांपैकी हे डॉक्टर नव्हते ) त्यांनी कांहीं औषधयोजना करून पाहिली, गूण नाही. थोड थोडा खोकला येऊं लागला नंतर त्या वरील डॉ. वेलस यांना प्रकृती दाखविली असतां त्यांनी थोडे दिवस औषधयोजना करून पाहून गूण नसल्यामुळें हवा पालट करण्यासाठी नाशिकसारख्या ठिकाणी जाण्याचा सल्ला दिला. परंतु हें काम आमच्या वर्गाचें असल्यामुळें रा. खोतांचें ऐपती बाहेरचें होतें. दुसऱ्या दिवशीं रात्रीं आमचेकडे आरती चालली असतांना रा. खोत आले व म्हणाले आमचे बाबूस क्षयरोग झाल्याचें डॉ. म्हणतात आतां मी गरीब माणसानें काय करावें, मी म्हटलें निष्ठा असल्यास श्रींची उदी घेऊन जा थोडी पोटांत घ्या व अंथरुणाखाली उशास ठेवा. त्याप्रमाणें त्यांनी उदी देण्यास सुरवात केली ८ दिवसांत ताप बंद झाला.पुढें खोकला औषधा शिवाय साफ गेला व एक महिन्यांत प्रकृती साफ बरी झाली. पुढें वरील डॉ. वेलसना प्रकृती दाखवितां प्रकृति साफ झाली घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं व औषध योग्य पोचल्याचें सांगितलें. याप्रमाणें शेंकडों अनुभव येत आहेत ते सवडीप्रमाणें मागाहून पाठवीन लेखन सराव नसल्यामुळें लिहिण्यांत ऱ्याच चुका झाल्या असतील त्या सुधारून घ्याव्या क०.

आपला नम्र,

गणेश गोपाळ महाजन

सामंतांची वाडी ठाणें.

## रा. रा. विनायक शंकर गिरिधर यांचा श्रीसाईबाबांबद्दल अनुभव.

### श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

श्री साईबाबांबद्दल माझ्या अनुभवांस आपल्या मासिकांत स्थळ मिळण्यास विनंति आहे.

सन १९१२ साली माझी बदली आंधेरी नजीक गुंदवलीस झाली. मी तलाठीचें काम करीत असतों. मी आंधेरी येथें रा. मुकुंद सदाशिव पाटील यांच्या देवळानजीकचे चाळींत राहत होतों. आंधेरी येथें आल्यानंतर थोडया दिवसांनी आंधेरीचे स्टांपवैंडर रा. रामचंद्र सिताराम देव यांची ओळख झाली. पुढें त्यांच्या येथें नेहमीं जाणे येणें होत असे. त्यांनीं मजला शिर्डी येथील समर्थांकडे जाऊन त्यांचे दर्शन घेण्यास सांगितलें. त्यावरून महाराजांकडे शिमग्याचे महिन्यांत पहिल्यानें दर्शनास गेलों. मग तेथून तीन दिवसांनी दर्शन घेऊन परत आलों. पुढें तीन महिन्यांनी म्हणजे आषाढ महिन्यांत फार पाऊस पडून जेथें तेथें पाणीच पाणी भरून राहिलें होतें. मी राहत होतों त्या चाळीचे मावळत बाजूला किराण्याचें दुकान होतें. त्याचे मागचे बाजूस घराचा पाया घालण्याकरितां सुमारें सहा फूट खोलीचा व दोन फूट रुंदीचा चर खणलेला होता. तो चर पाण्यानें भरून मागील परसांत पाणी जमल्यामुळें दिसेनासा झाला होता. एके दिवशीं संध्याकाळीं माझा मुलगा पाऊस पडत असतां छत्री घेऊन पाणी जमलें होतें त्यांत फिरूं लागला. त्यावेळीं त्याचें वय केवळ तीन वर्षांचे होतें. फिरतां फिरतां तो त्या चरांत पडला. तो आंगांतील कपडयासह व डोकींतली टोपी व हातांतील छत्रीसह आंत पडला. त्यावेळीं आसपास तेथें कोणी नव्हतें. त्यानंतर थोडया वेळानें त्याची आई शौच्यास गेली होती ती परत आली असतां मुलगा कोठें आहे म्हणून तपास करूं लागली. तों हा त्या चरांतून चढून बाहेर येत असतांना तिनें पाहिलें. मी घरांत नव्हतों व बाहेरून आल्यानंतर मला समजलें तेव्हां मी मागले द्वारीं येऊन पाहातों तों त्याचे आंगावरील कपडे व टोपी भिजून गेली आहे व हा त्या चरांतून बाहेर

आल्याचें समजलें. मी त्याला विचारिलें तूं त्यांतून चढून कसा आलास? तो म्हणाला चढण्याकरितां कोनाडे व पायऱ्या केल्या आहेत त्या चढून वर आलों. त्या घरांत छत्री राहिली. होती ती वर काढून घेतली थोडया वेळानें त्या ठिकाणीं ही हकीगत समजल्यावरून मंडळी जमली. त्यांनीं हा मुलगा स्वत: वर आल्याचें समजल्यावर सर्वांस आश्चर्य वाटलें. ही गोष्ट घडण्यापूर्वी एक दिवसांवर ' हा निजलेला असोन आम्ही उभयतां शोक करीत आहों ' असें समर्थांनीं स्वप्नांत सूचित केलें होतें. तेव्हांपासून महाराजांवर जास्त भक्ती जडली व शिरडीस कधीं जाणें झालें असतां समर्थांकरितां माझ्या कुटुंबानें हार गुंफून द्यावा.

एकदां समर्थांच्या दर्शनास रा. रा. रामचंद्र सिताराम देव, गणेश पांडुरंग बेंद्रे व मी असें मिळून आम्ही शिरडीस गेलों होतों. जातांना समर्थांकरितां माझ्या कुटुंबानें साईबाबांकरितां गुलाबांचे फुलांचा हार गुंफून दिला होता तो शिरडीस बाबांचे दर्शन घेण्याचे वेळीं गळ्यांत घातला. त्यावेळीं समर्थ म्हणाले ' हा माझ्या प्रेमाचा हार आहे ' तो हार समर्थांनीं बराच वेळ ठेविला होता. दुसरे लोकही दर्शनास आलेले होते. त्यांनीं घातलेले हार तावडतोब काढून टाकीत असत. त्याच रात्रीं इकडे अंधेरीस माझ्या कुटुंबास स्वप्नांत येऊन सांगितलें कीं ' मला हा हार घातला होता हा प्रेमाचा होता व असाच मला आनंदानें वारंवार घालीत जा.'

आम्ही एकदां बेंद्रे मास्तर रामचंद्र सिताराम व मी असे तिघेजण मुलांसह बाबांच्या दर्शनाकरितां शिरडीस गेलों होतों. समर्थांचे दर्शन घेतेवेळीं श्रीचे चरणावर मुलाला घातला. त्यावेळीं मी मनात म्हणालों, 'बाबा, हा तुमचा आहे; याचा संभाळ तुम्ही करावा.' पुढें आठ वर्षांनीं म्हणजे सन १९२२ सालीं जुलई महिन्यांत माझी बदली डहाणू तालुक्याहून बांद्रे येथें झाली. त्यावेळीं बांद्र्यास मी बिऱ्हाड केलें नव्हतें. मुलाला व बायकोला आजोळास आगाशी येथें ठेविलें व मी एकटाच बांद्र्यास होतों. इकडे सुमारें पंधरा दिवसांनीं श्रावण महिन्यां मुलाला प्लेग झाला, ताप आल्या-

लागलेंच मला वांद्र्यास माझ्या मेहुण्यानें येऊन कळविलें. मी तसाच गाशीस गेलों व पहातों तों त्यास तापामुळें शुद्धि नव्हती. वायू होऊन बड करीत होता. पुढें जीभही बोबडी पडली होती. डाव्या जांघेंत दुखूं गलें व अरनाळकर डाक्टर रा. रा. दिनकर जगन्नाथ गाळवणकर यांचें षध सुरूं केलें होतें. ही केस बाटावणें फार कठीण होतें. रोज मनांत वराचा व बाबांचा धांवा करीत होतों. इतकी जरी स्थिति होती तरी दुख- यांत त्यानें श्री साईबाबांचा फोटो उशाजवळ ठेवला होता व बाबांस हणत असे 'मजला लवकर बरें करा, मी समाधीचें दर्शन घेईन' व बाबांची दी सकाळ संध्याकाळ रोज घेत असे. असें भयंकर संकट आलें होतें व ांतून समर्थानीं पार पाडलें. पहिले तीन दिवस ही केस हातांत येईल असें डाक्टरांसही वाटत नव्हतें. अकरावे दिवशीं रोजच्याप्रमाणें डाक्टरनें इंजेक्शन केल्यानंतर आम्हां सर्वांस सांगितलें कीं ' कांहीं भिऊ नको बरा होईल ' अशी इंजेक्शनें दिवसांतून दोन वेळ कांहीं दिवस केलीं. नंतर ताप निघून गांठ फुटून बरी झाली. समर्थांची लीला अगाध आहे. त्यांची कृपा सर्व भक्तांवर सारखीच असते.

तसेंच ही गोष्ट घडण्यापूर्वी एक वर्ष आधीं मी आगाशीस असतांना माझें कुटुंब न्यूमोनियाचे तापानें फारच सीक झालें. त्यावेळीं तिची सावत्र आई व दोन लहान भावंडें अशीं तीन मनुष्यें चार दिवसांत गेलीं. नंतर तिची चुलती त्याच तापानें सीक होऊन पांचसहा दिवसांनीं तीही गेली. परंतु समर्थांच्या कृपेनें डॉक्टर दिनकरराव गाळवणकर यांच्या मेहनतीला यश आलें. दुखण्यांत असतांना 'बाबांनीं प्रत्यक्ष दत्ताचे रूपानें येऊन माझे वडील भावजयीचे ओटींत द्दिव्य घातलें ' असा दृष्टांत म्हणजे प्रत्यक्ष तिला असा भास झाला. व त्या दिवसापासून दुखण्याचें मान कमी झालें. नंतर ताप निघून बऱ्याच दिवसांनीं ती बरी झाली. असे समर्थांचे अनुभव नेहमी येतात.

समर्थांनीं समाधी घेण्याचे पूर्वी माझ्या कुटुंबाला स्वप्नांत येऊन सांगितलें कीं ' मुलाला स्नान दुरून घाल ' परंतु आम्हांस याचा अर्थ

कांहींच समजला नाहीं त्यावेळीं आम्ही मनोरी गार्वी होतों. पुढें मेघून पंधे दिवशीं मांद्वास जाऊन आल्यानंतर समजलें कीं—दसऱ्याचे दिवशीं समर्थांनीं समाधी घेतली. तेव्हां त्यांच्या दृष्टांताचें कौतुक वाटलें. महाराजांचे अनुभव अद्यापिही पुष्कळ येत आहेत; त्यांतील मुख्य मुख्य ज्यांची आठवण झाली ते समर्थांच्या प्रेरणेनें पाठविले आहेत.

आपला

विनायक शंकर गिरधर, मु॥ मालाड.

## श्री. सद्गुरू साईनाथ

रा. रा. जनार्दन मोरेश्वर फणसे ऊर्फ हरीभाऊ फणसे डहाणूकर यांचा अनुभव. यांस बाबांनीं बाबुल्सार असें म्हटलें आहे.

एक बाबांचे लेंकरूं त्यांचे हुकुमानें बरळत आहे.

मी एक अगदीं गरीब स्थितींतील माणूस असल्यामुळें व कुटुंबाचा बोजा जास्त माझेवर अवलंबून असल्यामुळें अतिशय त्रस्त होऊन रामेश्वरास जाण्यास घरून आईची आज्ञा घेऊन निघालों. परंतु जातांना संत लोकांचीं जितकीं दर्शनें मिळतील तितकीं घ्यावीं अशी इच्छा पूर्व सुकृतानें झाली गेली व त्याप्रमाणें सध्यां सत्पुरूष शिर्डी येथें अवतरले आहेत असें कळलें. तों शिर्डीसच गेलों. समर्थांचें दर्शन होतांच कांहीं दक्षिणा मला दे व मला ब्राह्मणाला संतुष्ट केल्याशिवाय तुला रामेश्वरची यात्रा सफल होणार नाहीं असें म्हणाले. त्यावेळींच माझे मनाचा निश्चय झाला कीं, भो हो. यांचे पुढें यात्रा ती काय जास्त आहे ! हा निश्चय होतांच महाराजांनीं रामेश्वरास जाण्या येण्यास फक्त रेल्वे चार्ज पडेल तो आंकडा मागितला. हा आंकडा मग मी हिशोब केला तेव्हां समजला. ( त्यांचे तोंडचे वाक्याप्रमाणें रुपये मोजून दिले. रुपये हातांत पडतांच बाबा म्हणाले कीं तुला आतां कोठलेही यात्रेस जाण्याची जरूर नाहीं. मी भीत भीत म्हटलें कीं

मला जर इकडेच रामेश्वर दिसला तर जास्त प्रवासाची जरूर काय ? कारण ही श्रद्धा बसण्याचें कारण ती मूर्ति पाहतांच मला असें वाटलें कीं, हा माझा आजोबा कीं पंजोबा आहे. अनेक वेळ पाहिलेला दिसतो व पुष्कळ वेळ ह्यांच्या माझ्या बैठकी व सदुपदेश जाहला आहे. असें ज्ञास भासलें. मी रजा ६ महिन्यांची बिनपगारी घेतल्यामुळें बरेच दिवस इकडे रहावें अशा बेतानें सेवा करीत होतों. सात दिवस सेवा झाल्यावर सकाळीं दर्शनास जातां क्षणीं कळविलें कीं भाऊ घरीं जा, रामेश्वर तूं घरीं आल्यापासून उपाशी आहे. जा नाहींतर रामेश्वर न होतां भद्रेश्वर होईल. ७ दिवसांत तिकडे दिवसा शिर्डी व रात्रीं झोंपेंत रामेश्वर अशा आनंदांत असल्यामुळें मी त्या वाक्यावर विश्वास ठेऊन घरीं आलों व पाहतों तों मातोश्रीनें मी गेल्यापासून संतापानें अन्न वर्ज्य केलें होते व मनाचा असा निर्धार केला होता कीं हा खरा साधू असेल तर माझे मुलाचा निश्चय बदलून त्याला सात दिवसांचे आंत डहाणूला परत पाठवील. नाहीं पेक्षां मी ७ दिवस उपास करून ८ वे दिवशीं दूध मात्र घेईन व मुलगा जेव्हां परत येईल तेव्हांच अन्न घेईन. असो.

'आपणा सारीखे करीती तात्काळ " काशी स्नान जप प्रति दिवशीं निद्रामाहूर देशीं " या वाक्याप्रमाणें मला प्रत्यक्ष अनुभव दाखविला.

इकडे ह्याची गादी स्थापन आहे म्हणजे पादुका, कफनी, रुमाल, असें सामान बाबा दिल्यावर सांगितलें कीं मी तुझ्याबरोबर येतों. इकडे हे लोक मला फार त्रास देतात. तेव्हां मी सांगितलें चला. तेव्हां महाराज म्हणाले सर्व ठिकाणीं मी पूर्ण भरलेला आहें. जें डोळ्यानें दिसेल तें सर्व मिळून मी आहें. माझें येणें जाणें नाहीं. मी हालत अगर चालत नाहीं. आपण चांगलें करून अल्लाला द्यावें म्हणजे चांगलेंच होईल, चांगलें करील त्याचेच मालक अल्ला आहेत. वाईट करतात व चांगलें माझे जवळ मागतात मी कोठून देऊं ? नंतर जातांना सांगितलें कीं ७ दिवस उपास केलेस तरी भूक लागणार नाहीं. त्याप्रमाणें मी घरीं जातांच ७ दिवस उपास करावे

असा मनांत विचार येऊन राहिलों. त्या वेळीं मी उतार काढले कीं त्या आईला उपास पडले तो उपास माझ्या करितां तेवढे मला देवानें पाडले परंतु तसें नाहीं. ७ दिवस मी एकांतामध्यें बसलों असतां पर्यंतरी ८ व्यास होतांच ३ तास बेसावध रीतीनें झोंप लागली ती दुपारीं १२ वाजल्यापासून ३ वाजे पर्यंत त्या वेळांत ज्योतिषाच्या आधारें मृत्यूची वेळ होती ती टळली; व मी आपलें टिपण ( पत्रिका ) जाळून टाकली व जो इतकें सांभाळणार आहे त्यापुढें ज्योतिष काय आणि कर्म काय ? कारण बाबांनी सांगितलें कीं कोणतेंही चांगलें काम करीत असावें पुढें अल्ला मालीक आहे. त्याच्या हुकमाशिवाय झाडाचें पान देखील हालत नाहीं.

एका वेळीं असें झालें कीं एक कॉलऱ्याची केस होती. कॉलेरा झालेल्या माणसास माझेजवळ बाबांची उदी शिल्लक असलेली पाण्यांत टाकून पिण्यास दिली. तो इसम सुधारला. त्यामुळें त्या गांवीं मी चांगला वैद्य आहें अशी लोकांची खात्री जाहली. मला विचार पडला कीं, देवा उदीतर संपली आतां कसें होईल? परंतु त्या दिवसापासून त्या गांवचा कॉलराच नाहींसा झाला. परंतु मी वैद्य चांगला हें मात्र शिल्लक राहिलें. नंतर भोपोली गांवीं एक मारवाडी राहात असे. त्याचा भाऊ सीक जाहला. त्यास कुढाणच्या संस्थानिक सरकारी डाक्टरचें औषध चालू होतें. त्यास गुण न येतां त्याची तबीयत जास्तच जाहली व तो व त्याचा भाऊ गाडीत बसून डाक्टरांना आणण्यास गेला. परंतु डाक्टर आदल्या दिवशींच रजेवर निघून गेल्यामुळें तो निराश होऊन घरीं परत आला. इतक्यांत माझा मुक्काम त्याचे घरीं गेला. त्या इसमांनीं मला पाहतांच म्हटलें कीं, तुम्ही प्रत्यक्ष बाबांना इकडे आणून भजन पूजन करतां तर मग ह्या माझ्या भावाला औषध देऊन चांगला कराल तर बाबा खरे असें मी म्हणेन, नाहीं तर तो साई लुच्चा आहे असें समजेन. त्यावेळीं मी त्या इसमाची तबीयत पाहिली. पाहिल्याबरोबर इकडे आपण राहूं नये असें वाटलें परंतु रात्र झाल्यामुळें तिकडे राहणें भाग आलें. नंतर जेवणखाण

आटपून भजन करण्यास बसल्यावेळीं त्या इसमानें नारळ, तुपाचा दिवा, खडीसाखर, उदबत्ती, वगैरे सामान बाबांच्या फोटोजवळ ठेविलें. तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, हा जर मनुष्य सीक आहे, उठणें बसणें बंद पडलें होतें, शुद्धीही असून नसून होती. अशा स्थितींत ह्या इसमानें सामान आणलें व त्यास तसाच ठेऊन भजन संपेपर्यंत फोटोकडे ध्यान लावून स्वस्थ भजन ऐकत बसला तर ठीक झालें. नंतर मला निजतांना म्हणाला माझा भाऊ मेला तरी हरकत नाहीं परंतु तुमचें औषध घेणार. मी रोगाच्या बाबतींत परिक्षक नसून औषधाची मला माहितीही नाहीं हें जर खरें आहे तर मी ह्यास काय औषध देणार ? असो. सद्गुरूची मर्जी असें म्हणून निजलों आणि सकाळीं औषध मागितल्यास काय करावें ह्या विचारानें निजलों. झोंप लागतांच बाबांनीं स्वप्नांत सांगितलें कीं, काय भाऊ तूं जर वैद्य म्हणवीत नाहींस तर तुला युक्ति सांगतों. हा अमूक रोग आहे. ह्या रोगास अमुक औषध दे म्हणजे तो बरा होईल. सकाळीं समक्ष दिसोन आलें रोगी पुष्कळसा बरा जाहला परंतु त्यानें सांगितलें कीं ( तुमचे ) गुरूनें आज मला कळविलें की ह्याचेजवळ औषध घे, तुझ्या भावास हा बरा करील. तेव्हां तुम्हीं मला राख द्या मी ती २०० रुपये फी घेणार डॅाक्टरपेक्षां जास्त विश्वासानें माझ्या भावास देईन व तो बरा होईल, अशी माझी पूर्ण खात्री आहे. त्यावेळीं त्या सांगितलेल्या औषधाचा तपास करून तें त्यास दिलें. व तो त्याप्रमाणें चांगला झाला. तेव्हां मी ह्यांत कांहीं केलेंच नाहीं. सदर माणसास पंडुरोग झाला होता असें समर्थांचें म्हणणें होतें. त्याबद्दल मी पैसे किंवा कोणताही मोबदला घेणार नाहीं असें त्यांस स्पष्ट सांगून निघून गेलों. परंतु त्या इसमास फार वाईट वाटून त्यानें आमचे बिऱ्हाडीं मी हजर नसल्यावेळीं जरीचा फेटा आणून दिला. मला ही गोष्ट समजतांच त्याची किंमत काय असावी असा तपास करून तो ज्या किंमतीचा असेल ती किंमत समर्थांस पाठवून मग विकत घेतल्याप्रमाणें तो वापरण्यास हरकत नाहीं असें ठरविलें. त्याची किंमत माझ्याजवळ सवड नसल्यामुळें तो रुमाल मी पेटींत ठेविला. इतके अवकाशांत समर्थांनीं आपला अवतार संपविल्याचें

पत्र मिळाल्यावर मी फार दिलगिर जाहलों व गुरुवारीं भजनास बसलों असतांना फार वाईट वाटून डोळ्यांत पाणी येऊन बरेंच असमाधान जाहलें.नंतर निजल्यावर साक्षात्कार समक्ष सांगितलें कीं दुष्काळ आहे तर हे रुपये व दुसरे तुजपाशीं असलेले रुपये मिळून तांदूळ आणून तोटयाचा धंदा कर. त्यांत ते सर्व रुपये संपेपर्यंत तोटयानें धंदा कर व नंतर तोच धंदा नफ्यानें कर म्हणजे तुझी गुजरण होईल. मग दुसऱ्याची नोकरी करणें नको. अल्ला मालीक आहे. तो सर्व जगाचे अपराध पोटांत घालणारा असोन सर्वांस समजत आहे. बरें-वाईट त्याला सर्व कांहीं दिसतें व समजतें. तूं काळजी करूं नको. तुझे बरोबर मी आहें. तूं मजवर जितका भार टाकशील तितका मी घेण्यास खबरदार आहें.व तूं घेशील तेवढा तुजवर आहे.असें तूं मानशील तरी सुद्धां मी तुजवर पडूं देणार नाहीं. त्याप्रमाणें.मी त्यांच्यावर भार घालून धान्याचें दुकान चालूं ठेविलें आहे..आज दुष्काळाचे सालीं.५० साठ हजार रुपयांची उलथापालथ सद्गुरूनीं केली व त्यामुळें १० वीस हजार रुपयांचा धंदा मी त्या भरंवशावर सहज करीत आहें..म्हणजे ते मजपासून करून घेत आहेत. सदरहू अवतार देवाचा उपअवतार होऊन गेला.पूर्वी गाणगापूर येथें नरसिंह-सरस्वतीचा अवतार जाहला तसाच हा अवतार प्रत्यक्ष भगवान होते असें माझ्या मतें सातजन्म मागेल ज्ञानावरून स्पष्ट झालें. असो. थोडेसेंच लिहून पुरें करितों. कारण ह्या कामाची जलदी फार आहे. पुढें मागें कोणी असाच श्रींचा भक्त कोणी ग्रंथास माहिती मागेल त्यास पुढें देतां येईल. कळावें, लोभ असावा हे विनंती.

सद्गुरूच्या चरणारविंदींचा
एक पदरजकण

॥ श्री गुरुदेव ॥

# ॥ भूपाळी ॥

ऊठ ऊठ सुखधामा आतां गुरुवावासाई ॥
सुखद दर्शना देऊनि सारें अघ विलया नेई ॥ १ ॥
माया तिमिरीं घोरत पडले जन अवघे नाथा ॥
कृपा दृष्टिनें न्याहळीं त्यानां ऊठ त्वरें आतां ॥ २ ॥
धर्माचें तें मूळ करपलें कुकल्पना ज्वाळीं ॥
बोधामृत तव सिंचन करुनि त्यातें प्रतिपाळी ॥ ३ ॥
साह्य तुला करण्यास उभा हा संतांचा मेळा ॥
नारद तुंबर शुकसनकादिक दावी मुखकमला ॥ ४ ॥
आदिनाथ मछिंद्र गोरख जालंदरनाथ ॥
कानिफ गुप्तेशासह आले श्री गहिनीनाथ ॥ ५ ॥
ज्ञान पीयूषा पाजुनि सुखमय जन अवघे केले ॥
निवृत्ति सोपानासह भगवान ज्ञानराज आले ॥ ६ ॥
ब्रह्मरूपही माया झाली श्री मुक्ताबाई ॥
सिद्धवटेश्वर चांगा झाला लीन जिचे पायीं ॥ ७ ॥
द्वारिं उभा जोहार करी तुज चोखा संतमणी ॥
गोरोबा सांवता सेना आले ऊठ झणीं ॥ ८ ॥
ज्याचें प्रेमळ गाणें पडलें विश्वंठकाठकतें ॥
नामदेव हे आले लोटीं निद्रेला परतें ॥ ९ ॥
भक्तिबळानें प्रभुला ज्यांनीं स्वगृहीं राबविलें ॥
जनार्दनाचे एकनाथ हे तुज वहाण्या आले ॥ १० ॥
अखिल जगाला भूषण जो का मारुति अवतार ॥
छत्रपति शिवबासह आला समर्थ दातार ॥ ११ ॥
अभंग वाचे भजन करुनियां आळवीत तुजला ॥
तुकाराम महाराज उभे हे ऊठ झणीं विमला ॥ १२ ॥
गंगा गोदा रेवा यांचें निर्मळस पाणी ॥
मुख मार्जन तुज करण्या नाथा संत सखू आणी ॥ १३ ॥
नानापरिचे बालभोग ते घेऊनियां हातां ॥
मिराबाई ही आली आतां ऊठ दयावंता ॥ १४ ॥

भक्तोद्धरणा ज्यांचा सदया घेशी अवतार ॥
कबीर आले रामनामिचें घेऊनियां चीर ॥ १५ ॥
चिते मथुनियां प्रगट ज्यांच्या व्यंकटेश झाले ॥
सैलूचे सत्परमगुरु "गोपालनाथ" आले ॥ १६ ॥
गंगागिर गोसावी वाही प्रेमें तुजलागीं ॥
पळुसकर धोंडिबा आले ऊठ ऊठ वेगीं ॥ १७ ॥
ऐक्यपणीं तव स्वरूप सांवळें ज्यांनीं दावियलें ॥
चित्रकूटीचे नाथ दयाळा माधवजी आले ॥ १८ ॥
रसना ज्यांची नामीं रतली नाथा दिनराती ॥
रामबाई ओवाळीत घेऊनि काकडा हातीं ॥ १९ ॥
"राधाकृष्णा" होऊनि आंगण झाडी जनाबाई ॥
तन मन धन तें अर्पण करूनि प्रेमें तव पायीं ॥ २० ॥
परिवार तुझा "काका" "नाना" घेऊनि समवेत ॥
म्हाळसापति आले ज्यांचा तवचरणीं हेत ॥ २१ ॥
भक्ति प्रेमें गाऊनि ज्यांनें आकळिलें प्रभुला ॥
संत कुळांचा भाट तुझा हा "दास गणू" आला ॥ २२ ॥
खंजरी घेऊनि हातीं "भगत" करि नर्तन प्रेमानें ॥
पंचप्राणें निंबलोण करी "राळ" तुझें तान्हें ॥ २३ ॥

श्री साईबाबांच्या एका भक्तांकडून

## संक्रांतीचा तिळगुळ. ॥

श्री साईबाबांना अर्पण

(चालः– आनंदाचा कंद हरी हा.)

तिळगुळ जैसा साखर गुळ हा मिश्रण करूनी बनवीती,
तैशी भक्ति हा तिळ म्हणुन प्रेमरसाची साखर ती ॥ धृ० ॥
मिश्रण हाचें करूना आपण अर्पण करूंया साईनां,
प्रेमानंदें स्वीकारा हें विनवी असें मी बाबांना ॥ १ ॥

## आपणांस यांजकडून तिळगुळाचा प्रसाद

(भजनी गीत)

पूर्ण कृपाही तीळ घेऊनी,
ज्ञान रसाची साखर घालुनी,
मिश्रण यांचें आपण करुनी,
तिळगुळ मागूं हा ॥ १ ॥

मिळतां सार्थक होईल साचें
पूर्णाशा अशी मी मनि करितें
अल्पमति मी तिळगुळ लिहितें
प्रेमें स्वीकारा. ॥ २ ॥

## ॥ श्री उद्धवेश बुवांचें पद ॥

पद–चाल–साध्य नसे मुनि कन्या.

वंदन साई पदाला ॥
तारक होवो सकल जगाला ॥ धृ० ॥

भालीं त्रिपुंड्र गंधहि साजे ॥
शुभ्र वस्त्रही शिरीं विराजे ॥
गौरांकित तनु ऐशा
ध्यातां धांवत तारी त्याला ॥ वंद० ॥ १ ॥

नानापरि तूं बोधिसि ताता
काम मदादिक षड्रिपु हर्ता ॥
तो गुरु शाऽमासी हो ज्ञाता ॥
लागा भजनीं विनवी तुम्हाला ॥ वंद० ॥ २ ॥

## ॥ श्री उद्धवेश बुवांचा हलवा ॥

चला चलारे हलवा करुं या ज्ञानाचा सत्वरी ॥
अर्पूया श्री गुरु चरणावरी ॥ १ ॥
ज्ञानार्तीची परात विस्तृत ठेवुनियां त्यावरी ॥
भक्तिचे तिळ घालूं भीतरी ॥ २ ॥

१ गोरें. २ श्री उद्धवेश.

आनंदाचा रंग केसरी मथुनि मथुनियां दिला ॥
आतां तो खुलेल बहु चांगला ॥ ३ ॥
सद्बोधाचें खड्गतेंचि जें वेळा जायफळादी ॥
कामक्रोध हे येतां जवळी दग्धचि होती समुळ अर्दी ॥ ४ ॥
सांइसुत जो शामदास हा हलवा करवी जरी ॥
गुरुरायाचा प्रसाद म्हणुनी तिळगुळ देत करीं ॥ ५ ॥

## आत्मबोध–जन्मोत्सव अंक.

येत्या ध्वजारोपणाचे दिवशीं म्हणजे श्रीनाथमहाराजांच्या जन्मोत्सवाचे दिवशीं ( ता. १३–४–२६ रोजीं ) प्रसिद्ध होईल. सदर अंकांत श्रीनाथांच्या समकालीन ब्रह्मीभूत व विद्यमान विभूति श्रीशीलनाथ महाराज श्रीपरमहंसमहाराज नासिक, श्री धोंडीबुवामहाराज पलुसकर, श्रीसाईनाथमहाराज, श्रीगोविंद महाराज सोनगीर, श्रीउपासनीमहाराज साकोरी इत्यादिकांचीं फोटोसह त्रोटक चरित्रें देण्याचा आमचा विचार आहे. आतांपर्यंत खालील लेखकांनीं लेखांचें अभिवचन दिलें आहे व कांहींचे लेख आलेही आहेत.

कै. रा. ब. जस्टिस कीर्तने ( अवतार रहस्य ), श्रीमंत सरदार किबेसाहेब, श्री. चिं. वैद्य, श्री. स. वा. हुदलीकर, श्री. वाकणकर, श्रीमंत सौ. कमलाबाईसाहेब किबे इ. ”

हें कार्य अतिशय खर्चाचें आहे. हलींच्या अंकापेक्षां जवळ जवळ दुप्पट पानें, सुंदर, गुळगुळीत, जाड, देशी कागद व निरनिराळ्या शाईत फोटो इतकें असून तो वर्गणीदारांस मिळेल. वार्षिक वर्गणी ट. ख. सह तीन रुपये, व्ही. पी. खर्च निराळा, तरी नवीन होणाऱ्या वर्गणीदारांनीं अशी संधि घालवूं नये. इतरांस फक्त हाच फुटकळ अंक १२ आणे, ट. ख. ४ आणे. चालू वर्षी जाहिराती घ्यावयाच्या असें मंडळानें ठरविल्यामुळें जाहिरात देणारांनीं त्वरा करावी. आत्मबोधाचा खप शहरापासून तों अगदीं लहान खेड्यांतही असल्यामुळें प्रसिद्धीचें कार्य अगदीं अल्प वेतनांत होईल. जाहिरातींचे दर समक्ष अथवा पत्रद्वारें.

—चिटणीसः—श्रीनाथकार्य–प्रवर्तक–मंडळ, सरस्वती–निकेतन,
इंदूर छावणी.

# अध्याय ३७ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

धन्य धन्य साईचें चरित ॥ धन्य तयाचें नित्याचरित ॥
क्रियाही अकळ अत्यद्भुत । इत्थंभूत अकथ्य ॥ १ ॥
अगाध त्याचें सच्चरित । धन्य तयाचें जीवनवृत्त ॥
धन्य धन्य तें अप्रतिहत । असिधाराव्रत तयाचें ॥ २ ॥
कधीं ब्रम्हानंदें उन्मत्त । कधीं ते निजबोधें तृप्त ॥
कधीं सर्व करूनि अलिप्त । ऐसी अनिश्चित ती स्थिति ॥ ३ ॥
कधीं सर्व प्रवृत्ति शून्य । तरी तो नव्हे निद्रासंपन्न ॥
निजस्वार्थीं ठेवूनि मन । सदा सावधान निजरूपीं ॥ ४ ॥
कधीं सागरसम प्रसन्न । परी तो दुरंत दुर्विगाह्य गहन ।
कोणा हें अगाधरूप निरूपण । यथार्थपणें करवेल ॥ ५ ॥
पुरुषांसवें धरी बंधुता । स्त्रिया तयाच्या बहिणी माता ॥
ब्रम्हचारी ऊर्ध्वरेता । ठावा समस्तां सर्वदा ॥ ६ ॥
ऐसियाचे सत्संगतीं । प्राप्त झाली जी मती ॥
तीच राहो निश्चल स्थिती । निधनप्राप्ती पर्यंत ॥ ७ ॥
उदंड व्हावी सेवावृत्ति । चरणीं जडावी अनन्य भक्ति ॥
भगवद्भाव सर्वां भूतीं । अखंड प्रीति तन्नामीं ॥ ८ ॥

पाहोनि त्याच्या एकेक कृती । जे जे कारण शोधूं जाती ॥
ते ते कुंठित होउनि अंतीं । स्वस्थचि बैसती तटस्थ ॥ ९ ॥
कितिएक स्वर्गसौख्या झगडती । वानिती अत्यंत स्वर्गाची महती ॥
ते भूलोका तुच्छ मानिती । मरणाची भीति म्हणती इथें ॥ १० ॥
परी अव्यक्तांतून आकारा येती । तियेसचि म्हणती व्यक्त स्थिती ॥
पुढें तीच प्रवेशतां अव्यक्तीं । मृत्यू म्हणती तियेस ॥ ११ ॥
अधर्म अज्ञान राग द्वेष । इत्यादिक हे मृत्युपाश ॥
यांचें उल्लंघन करी जो अशेष । त्यासींच प्रवेश स्वर्लोकीं ॥ १२ ॥
स्वर्ग स्वर्ग तो काय आणिक । वैराज तोच स्वर्ग लोक ॥
विराट आत्मस्वरूप देख । मानस दुःख विवर्जित ॥ १३ ॥
जेथें नाहीं रोगादि निमित्त । नाहीं चिंता व्याधी दुःख ॥
जेथें न क्षुधा तृषाकुलित । कोणी न व्यथित जराभयें ॥ १४ ॥
जेथें नाहीं मृत्यु भय । नाहीं विधिनिषेध द्वय ॥
जीव वावरे अत्यंत निर्भय । तीच कीं दिव्य स्वर्गस्थिति ॥ १५ ॥
जें आब्रह्मस्थावरांत । पूर्ण स्थावर जंगमांत ॥
तेंच तत्त्व परत्रीं वा येथ । नानात्वविरहित तेंच तें ॥ १६ ॥
असतां संसार धर्म वर्जित । होतां उपाधि समन्वित ॥
तेंच आभासे अब्रम्हवत । अविद्यामोहित जीवास ॥ १७ ॥
परब्रह्म तें मजहून भिन्न । तें मी नव्हे मी तों आन ॥
ऐसें जयाचें भेदज्ञान । तो मरणाधीन सर्वदा ॥ १८ ॥
जननापाठीं लागलें मरण । मरणापाठीं पुनर्जनन ॥
हें संसृतिचक्र परिवर्तन । पाठीस चिरंतन तयाच्या ॥ १९ ॥
दुष्कर यज्ञ तपोदान । इहीं जयाचें होय आपादन ॥
तें नारायण पद स्मृतिविहीन । स्वर्गायतन किमर्थ ॥ २० ॥

केवळ विषयभोगाचें स्थान । नळगे आपुलें स्वर्गभुवन ॥
जेथें न गोविंद नामस्मरण । काय कारण तयाचें ॥ २१ ॥

स्वर्गा जा अथवा नरका । फरक नाहीं विषयसुखा ॥
इंद्रा वा गर्दभा देखा । सुख त्रिलोका एकची ॥ २२ ॥

इंद्र नंदनवनीं घोळे । तोच रासभ उकिरडा लोळे ॥
सुख पाहतां एकचि तुळे । नाहीं तें वेगळें लवमात्र ॥ २३ ॥

जेथूनि पुण्यक्षयें पतन । किंनिमित्त तदर्थ यत्न ॥
त्याहून बरवें एथील जनन । महत्त्वें गहन भूलोक ॥ २४ ॥

जेथें आयुष्य कल्पवरी । काय त्या ब्रह्मलोकाची थोरी ॥
अल्पायुष्य हो का क्षणभरी । भूलोक परी आणीक ॥ २५ ॥

क्षणभंगूर आयुष्यपण । केलें कर्म एक क्षण ॥
करी जो सर्व ईश्वरार्पण । पावे अभय स्थान तो ॥ २६ ॥

जेथें न भगवद्भक्त जन । करिती न हरिगुरुकथावर्णन ॥
संगीत नृत्य भगवत्पूजन । तें काय स्थान कामाचें ॥ २७ ॥

ब्रह्मात्मैकत्व विज्ञान । आत्यंतिक निश्रेयस साधन ॥
तें तों या स्वर्गाहून गहन । भूलोक हें स्थान तयाचें ॥२८॥

कायावाचामनें करून । करा पंचही प्राण समर्पण ॥
निश्चयात्मक बुद्धि ही लीन । होवो गुर्वधीन सर्वस्वीं ॥२९॥

एवं सद्गुरूस शरण जातां । भवभयाची कायसी वार्ता ॥
प्रपंचाची किमर्थ चिंता । असतां निवारिता सर्वस्वीं ॥ ३० ॥

अविद्येचा जेथें वास । तेथें पुत्र पश्वादि पाश ॥
संसारचिंता अहर्निश । नाहीं लवलेश सुविचार ॥३१॥

अविद्या सर्वा मूळ कारण । उपस्थापी नानात्वविंदाना॥
आचार्यागम संस्कृत ज्ञान । तदर्थ संपादन करावें ॥३२॥

होतां अविद्यानिवर्तन । उरे न अणुमात्र नानात्व ज्ञान ॥
चुके तयाचें जन्म मरण । एकत्व विज्ञान या मूळ ॥ ३३ ॥
परी जो अल्पाल्प भेददृष्टी । पडेल जन्म मरणाचे कष्टीं ॥
तयास विनाश आणि सृष्टी । लागली पाठीं सदोदित ॥३४॥
श्रेय हाचि जीचा विषय । तीच ती विद्या निःसंशय ॥
जीचा विषय केवळ प्रेय । अविद्या नामधेय तियेस ॥३५॥
मृत्यू हेंच मोठें भवभय । तयापासून व्हावया निर्भय ॥
घट्ट धरा गुरु चरणद्वय । देतील अद्वय बुद्धीतें ॥ ३६ ॥
जेथें द्वितीया अभिनिवेश । तेथेंच कां या भयासीं प्रवेश ॥
म्हणोनि जेथें न भय लवलेश । तें निर्विशेष पद सेवा ॥ ३७ ॥
शुद्ध प्रेम मलयागर । लावा तयाचिया भाळावर ॥
नेसवा भावार्थ पीतांबर । दावील विश्वंभर निजभक्तां ॥ ३८ ॥
दृढ श्रद्धेचें सिंहासन । अष्टभावमंडित पूर्ण ॥
आनंदाश्रूजळें स्नपन । सद्यः प्रसन्न प्रकटेल ॥ ३९ ॥
भक्ति मेखळा कटीभोंती । बांधोनि आकळा तयाप्रती ॥
सर्वस्वाचें निंबलोण प्रीति । करा मग आरती ओंवाळा ॥ ४० ॥
कोण्याही कार्याचा प्रविलय । होई धरूनि अस्तित्वाश्रय ॥
खडयानें घट फोडिला जाय । निवृत्त होय आकारची ॥ ४१ ॥
घटास्तित्वांश लवमात्रही । नाहीं ऐसा होत नाहीं ॥
फुटक्या खापऱ्यांचियाही ठायीं । अनुवृत्ती होई घटाची ॥ ४२ ॥
म्हणून कार्याचें जें प्रविलापन । तें अस्तित्वनिष्ठ चिरंतन ॥
म्हणून कोणाचेंही देहावसान । नव्हे पर्यवसान शून्यत्वीं ॥ ४३ ॥
कार्य न कारणाव्यतिरिक्त । झालें व्यक्त जरी अव्यक्त ॥
तरी तें सदैव सदान्वित । हे तो सुमतीत सर्वत्र ॥ ४४ ॥

सूक्ष्मतेचिया न्यूनाधिक्याची । परंपरा ही दर्शवी ऐसी ॥
स्थूल कार्य विलयीं साची । सूक्ष्मकारणाची अवशिष्ट ॥ ४५ ॥
त्याचा ही विलय होतां । त्याहून सूक्ष्म अवशिष्ट राहतां ॥
सकलेंद्रिय मन बुद्धि ग्राहकता । पावे विकल्पना ग्रहणार्थी ॥ ४६ ॥
तात्पर्य बुद्धि ही जेथें ठके । तेथेंचि पूर्ण अपूर्णी ठाके ॥
परी त्याचा न सद्भाव झाके । सन्मात्र झळके सर्वत्र ॥ ४७ ॥
बुद्धि कामास देई आश्रय । म्हणोनि हिचा होतां विलय ॥
तात्काळ होई आत्मोदय । पडे अक्षय पद ठायीं ॥ ४८ ॥
अविद्या माया काम कर्म । हेच मुख्य मृत्यूचे धर्म ॥
होतां या सर्वांचा उपरम । होई उपशम बंधाचा ॥ ४९ ॥
होतां सर्व बंधननाश । प्रकटे आत्मा अप्रयास ॥
जैसा मेघ जाण्याचा अवकाश । स्वयंप्रकाश चमके रवी ॥ ५० ॥
शरीर मी, हें माझें धन । या नांव दृढ देहाभिमान ॥
हेंचि हृदयग्रंथि निबंधन ॥ दुःखाधिवेशन मायेचें ॥ ५१ ॥
जरी हा देह एकदां निमाला । कर्मबीजें देहांतर लाधला ॥
तें बीज निःशेष जाळावयाला । चुकला कीं आला पुनर्जन्म ॥५२॥
पुनश्च बीजांचे वृक्ष होती । वासनाबीजें देहांतर प्राप्ति ॥
ऐसें हें चक्र अव्याहत गती । वासना निमती तोंवरी ॥ ५३ ॥
कामांचा जैं समूळ विनाश । तैंच हृदयग्रंथिनिरास ॥
तैंच अमर मर्त्य मनुष्य । हाच उपदेश वेदांतीं ॥ ५४ ॥
धर्माधर्मविहित स्थिती । जिये नाम विरजा वदती ॥
अविद्या काम निर्मूलन कर्ती । जेथें न लव गति मृत्यूतें ॥ ५५ ॥
वासनांचा परित्याग । तोच ब्रह्मानंदाचा योग ॥
निश्चलेल्या त्या शब्द प्रयोग । वाचाविनियोग अनिर्वाच्या ॥ ५६ ॥

झालिया परब्रह्म संवित्ति । तीच सकलानिष्ट निवृत्ति ॥
तीच मनेप्सित इष्टप्राप्ति । हें श्रुतिस्मृति प्रामाण्य ॥५७॥

'ब्रह्मविदाप्नोति परं' । हेंच ब्रह्मानंदसाम्य चरम ॥
याहून अन्य काय परम । "तरति शोकमात्मवित्" ॥ ५८ ॥

संसारार्णव तमोमूळ । पावावया परकूळ ॥
ब्रह्मज्ञानचि उपाय निखळ । साधन सकळ प्राप्तीचें ॥५९॥

पूर्ण श्रद्धा आणि धीर । हेचि मूर्त उमामहेश्वर ॥
मस्तकीं नसतां यत्कृपाकर । दिसे न विश्वंभर हृदयस्थ ॥६०॥

वदले साईनाथ गुरुवर्य । उद्गार ज्यांचे अमोघवीर्य ॥
पाहिजे निष्ठेचें अल्प धैर्य । महदैश्वर्य पावाल ॥६१॥

असन्मात्र अवघें दृश्य । हें तों मानणें येतें अवश्य ॥
स्वप्नदर्शन घ्या प्रत्यक्ष । सर्वही अदृश्य प्रबोधीं ६२ ॥

येथवरी बुद्धीची धांव । येथवरीच आत्म्याशीं सद्भाव ॥
परी जेथें न सदसता ठाव । तो तत्त्वभाव तो आत्मा ॥ ६३ ॥

सदसदादि प्रत्ययवर्जित । अलिंग सर्व विशेषरहित ॥
तेंच शब्द शब्दांतर वर्णित । तेंच सर्वगत गुरुरूप ॥ ६४ ॥

आत्मा सर्व विशेष रहित । जरा जन्म मरणातीत ॥
हा पुराण आणि शाश्वत । अपक्षय वर्जित सर्वदा ॥ ६५ ॥

हा नित्य अज पुरातन । सर्वगत जैसें गगन ॥
अनादि आणि अविच्छिन्न । वृद्धि शून्य अविक्रिय ॥ ६६ ॥

जें अशब्द आणि अरूप । अनादि अनंत आणि अमूप ॥
अव्यय अगंध अरस अलेप । कवणातें स्वरूप वर्णवेल ॥ ६७ ॥

---

१ तट.

परी दिसना ऐसिया निर्गुणा ॥ नेणतपणें जरी नेणा ॥
ज्ञानें दवडा हा अज्ञानपणा । कधींही न म्हणा शून्य तया ॥ ६८ ॥

काय ती परमहंस थिती । श्रीसाईची निज संपत्ती ॥
काळें चोरिली होतोहाती । दिसेल मागुती ती काय ॥ ६९ ॥

धनसुतदारासक्त भक्त । राहूं द्या कीं यांची मात ॥
दर्शना येत योगी विरक्त । राहत आसक्त पदकमळीं ॥७०॥

काम कर्म बंध विमुक्त । सर्वैषणा विनिर्मुक्त ॥
देह गेहादिकीं विरक्त । जगीं भक्त तो धन्य ॥ ७१ ॥

साई जयाचा दृष्टि विषय । तया वस्त्वंतर दिसेल काय ॥
दृश्यमात्रीं साई शिवाय । रिकामा ठाय दिसेना ॥ ७२ ॥

वदनीं श्री साईचें नाम । हृदयीं श्रीसाईचें प्रेम ॥
तया नित्य आराम क्षेम । रक्षी स्वयमेव साई त्या ॥ ७३ ॥

श्रवणाचीही तीच गत । शब्द नाहीं साईव्यतिरिक्त ॥
घ्राणीं साई परिमळ भरत । रसना पघळत साईरसें ॥ ७४ ॥

सुखाचें जें सोलीव सुख । काय साईचें सुहास्य मुख ॥
धन्य भाग्याचा तो देख । जेणे तें शब्द पीयूख सेविलें ॥ ७५ ॥

कल्याणाचें निधान । सुख शांतीचें जन्मस्थान ॥
सदसद्विवेक वैराग्यवान । सदा सावधान अंतरीं ॥ ७६ ॥

गोरसेंसी वत्स धालें । तरी न मायेपासून हालें ॥
तैसें मन हें पाहिजे बांधिलें । दावणीं दाविलें गुरुपायीं ॥ ७७ ॥

न्हावया गुरुकृपानुरागा । वंदा तत्पद कमलपरागा ॥
केलिया हितबोधा जागा । अनुभव घ्यागा पदोपदीं ॥ ७८ ॥

यथेच्छ रमता इंद्रियार्थी । अंतरीं तैशा साई प्रीती ॥
तोचि काया गेईल अंतीं । स्वार्थी परमार्थी उभयत्र ॥ ७९ ॥

मंत्रसिद्ध मांत्रिक अंजन । दावी पायाळास भूमिगत धन ॥
तैसेंच गुरुपदरज धूसर नयन । ज्ञान विज्ञान पावती ॥ ८० ॥

सिद्धांचीं जीं जीं लक्षणें । साधकांचीं तीं तींच साधनें ॥
साध्य कराया दीर्घप्रयत्नें ॥ अभ्यास सूज्ञें करावा ॥ ८१ ॥

दुग्धापोटीं आहे घृत ॥ परी न करितां तें आम्लयुत ॥
नाहीं तक्र ना नवनीत । तेंही अपेक्षित संस्कारा ॥ ८२ ॥

तक्र घुसळल्या विरहीत । प्राप्त होईना नवनीत ॥
तेंही न करितां अग्निसंयुक्त । स्वादिष्ट घृत लाभेना ॥ ८३ ॥

पाहिजे संस्कार बलवत्तता । पूर्वाभ्यासें बुद्धिमत्ता ॥
अभ्यासावीण न चित्त शुद्धता । तिजवीण दुर्गमता ज्ञानास ॥ ८४ ॥

व्हावी निर्मळ चित्तवृत्ती । तरीच होईल आत्मप्राप्ती ॥
हाता नये जों ती स्वरूप स्थिति । भगवद्भक्ति सोडूं नये ॥ ८५ ॥

लागे भगवद्भक्तीचा पाया । मंदिर आत्मज्ञानाचें उठाया ॥
चारी मुक्तीचे कळस झळकाया । ध्वजा फडकाया विरक्तीची॥८६॥

रात्रंदिन कर्दमीं लोळती । श्वान सूकरें विष्टा भक्षितीं ॥
विषयभोग तींही भोगिती । तीच का महती नरदेहीं ॥ ८७ ॥

होय जेणें चित्त शुद्धि । जेणें अखंड ब्रह्मसिद्धि ॥
तें स्वधर्माचरण आधीं । तप हें साधी नरदेहें ॥ ८८ ॥

साधुसेवा मुक्तीचें घर । स्त्रैणसंग नरकद्वार ॥
हे पूज्य वृद्धजनोद्वार । विचाराई सर्वथा ॥८९॥

सदा सदाचार संपन्न । देह निर्वाहापुरतें अन्न ॥
गृहदारादि स्पृहाशून्य । ऐसा जो धन्य तो साधू ॥९०॥

जे जे अनिमेष चिंतिती साई । प्रचीतीची पहा नवलाई ॥
स्वयें साई तयांस ध्याई । होऊन उतराई तयांचा ॥९१॥

धन्य नामस्मरण महती । गुरूही भक्तस्मरण करिती ॥
ध्याता प्रवेशे ध्येयस्थिति । पूर्ण विस्मृति परस्परा ॥ ९२ ॥

तुम्ही जाणा तुमची करणी । मज तों अहर्निश तुमची घाकणी ॥
ऐसी बाबांची प्रेमळ वाणी । असेल स्मरणीं बहुतांच्या ॥९३॥

नलगे आम्हां ज्ञानकथा । पुरे हा एक साईचा गाथा ॥
कितीही पापें असोत माथा । संकटीं त्राता हा आम्हा ॥ ९४ ॥

जरी न करवतीं पारायणें । तरी यांतील गुरुभक्ति प्रकरणें ॥
श्रोतां कीजे हृदयाभरणें । नित्य श्रवणें नेमानें ॥ ९५ ॥

दिवसाच्या कोणत्याही प्रहरीं । वाचील नित्य हें चरित्र जरी ॥
निज गुरुराज सह श्रीहरी । भेटेल निर्धारी भाविकां ॥ ९६ ॥

अखंड लक्ष्मी नांदेल घरीं । वाचितील जे निरंतरी ॥
निदान जो एक सप्ताह करी । दरिद्र दूरी तयाचें ॥ ९७ ॥

हें मी वदतों ऐसें न म्हणा । तेणें संशय घेरील मना ॥
साईच वदवी माझियें वदना । क्लिष्ट कल्पना सोडावी ॥ ९८ ॥

तो हा सकळ गुणखाणी । साई निजभक्त कैवल्यदानी ॥
कथा जयाची कलिमलहरणी । श्रोतां श्रवणीं परिसिजे ॥ ९९ ॥

ऐसिया संत कथांपुढें । स्वर्ग सौख्य तें काय बापुडें ॥
कोण धुंडून पाहील तिकडे । टाकून रोकडें सत्कथन ॥ १०० ॥

सुख दुःख हे तो चित्तविकार । सत्संग सर्वदा निर्विकार ॥
कधीं चित्त चैतन्याकार । सुखदुःखा थारा देईना ॥ १०१ ॥

जें सुख मिळतां एकांतीं । कीं जें भक्तांकरितां भक्ति ॥
असो इंद्र कीं चक्रवर्ती । न मिळे कल्पांतीं तयांना ॥ १०२ ॥

प्रारब्धभोग बळवत्तर । बुद्धि उपजे कर्मानुसार ॥
उपजो परी हे नेमनेमांतर । भक्त तत्पर टाळील ॥ १०३ ॥

करा कीं भगीरथ उद्योग । चुकेना प्रारब्धकर्मभोग ॥
अवश्य भावित्वाचा योग । तयाचा वियोग अशक्य ॥ १०४ ॥

जैसें य दुःख अवांछित । सुखही तैसेंच अकल्पित ॥
देहप्रारब्धाची ही गत । आधींच अवगत संतांस ॥ १०५ ॥

अखंड तन्नामावर्तन । हेंचि आम्हा व्रत तप दान ॥
वेळोवेळीं शिर्डी प्रयाण । हेंचि तीर्थाटण आमुचें ॥ १०६ ॥

साईसाईति नामस्मरण । याच मंत्राचें अनुष्ठान ॥
हेंच ध्यान हेंच पुरश्चरण । अनन्य शरण या जावें ॥ १०७ ॥

निष्कपट प्रेमानुसंधान । इतुकेंच खरें तयाचें पूजन ॥
मग अंतरीं घ्या अनुभवून । अतर्क्य विंदान तयाचें ॥ १०८ ॥

पुरे आतां हें गुऱ्हाळ । आम्हा पाहिजे सत्वर गूळ ॥
पूर्व सूचित कथा रसाळ । श्रवणार्थ सकळ उत्सुक ॥ १०९ ॥

ऐसा श्रोतवृंदांचा भाव । जाणूनि सूचित कथा नवलाव ॥
आवरिला हा ग्रंथ गौरव । अवधानसौष्ठव राखाया ॥ ११० ॥

काव्य पदबंध व्युत्पत्ती । नेणे मी पामर मंदमती ॥
करभूत लखणी धरोनी हातीं । साईच लिहिविती तें लिहितों ॥ १११ ॥

साई नसता बुद्धिदाता । तरी मी कोण चरित्र लिहिता ॥
त्याची कथा तोचि वदविता । आणीक लिहिविताही तोच ॥११२॥

असो आतां कथानुसंधान । चावडी हंडी प्रसाद कथन ॥
करूं म्हणून दिधलें आश्वासन । कथा निरूपण तें परिसा ॥ ११३ ॥

आणीकही तदंगभूत । अथवा दुजिया कथा ज्या स्मरत ॥
त्या त्या सांगूं श्रोतयांप्रत । त्या सावचित्त परिसाव्या ॥ ११४ ॥

धन्य साई कथांचा नवलाव । धन्य धन्य श्रवण प्रभाव ॥
मननें प्रकटे निजस्वभाव । थोरावे सद्भाव साईपदीं ॥ ११५ ॥

आतां आधीं चावडी वर्णन । समारंभाचें करूं दिग्दर्शन ॥
बाबा करीत एकांतरा शयन । चावडी लागून नियमानें ॥ ११६ ॥

एक रात्र मशिदींत । दुजी क्रमीत चावडीप्रत ॥
ऐसा हा क्रम बाबांचा सतत । समाधीपर्यंत चालला ॥ ११७ ॥

पुढें एकूणीससें नऊ सन । दहा डिसेंबर तैं पासून ॥
चावडीमाजी साईचें अर्चन । भजन पूजन हों लागे ॥ ११८ ॥

तो चावडीचा समारंभ । यथामती करूं आरंभ ॥
करील साई कृपासंरंभ । तडीस विश्वंभर नेईल ॥ ११९ ॥

चावडीची येतां रात । भजन मंडळी मशिदी येत ॥
भजन दोन प्रहरपर्यंत । मंडपांत चालतसे ॥ १२० ॥

मागें रथ शोभायमान । दक्षिणांगीं तुलसी वृंदावन ॥
सन्मुख बाबा स्थानापन्न । मध्यें भक्तजन भजनार्थी ॥ १२१ ॥

हरिभजनीं जया आदर । ऐसे भक्त नारी नर ॥
सभामंडपीं येऊनि सत्वर । भजनतत्पर ठाकती ॥ १२२ ॥

कोणी करीं घेऊनि टाळ । कोणी चिपळीया करताळ ॥
कोणी मृदंग खंजिरी घोळ । भजन कल्लोळ मांडीत ॥ १२३ ॥

साई समर्थ चुंबक मणी । निज सत्तेचिया आकर्षणी ॥
जडलोह भक्तां लावूनि ओढणी । नकळत चरणीं ओढीत ॥ १२४ ॥

हलकारे दिवट्या पाजळती अंगणीं । तेथेंच पालखी श्रृंगारिती कोणी ॥
द्वारीं सज्ज वेत्रपाणी । करीत ललकारणी जयघोष ॥ १२५ ॥

चव्हाट्यावरी मखरें तोरणें । वरी अंबरीं झळकतीं निशाणें ॥
नूतन वस्त्रें दिव्याभरणें । बालकें भूषणीं श्रृंगारिलीं ॥ १२६ ॥

मशिदीचिया परिसरीं । उजळत दीपांच्या बहु हारी ॥
वारू शामकर्ण अंगण द्वारीं । पूर्ण शृंगारीं विराजत ॥ १२७ ॥

इतक्यांत तात्या पाटील येत । घेऊनियां मंडळीसमवेत ॥
बाबापाशीं येऊनि बैसत । निघाया उद्यत बाबांसवें ॥ १२८ ॥

बाबा जरी तयार असत । तात्या पाटील येईपर्यंत ॥
जागचे जागीं बैसूनि राहत । वाट पाहत तात्यांची ॥ १२९ ॥

जेव्हां खाकेंत घालूनि हात । तात्या पाटील बाबांस उठवित ॥
तेव्हांच बाबा निघाया सजत । चावडीप्रत तेथुनी ॥ १३० ॥

तात्या बाबांस म्हणत मामा । ऐसा परस्पर तयांचा प्रेमा ॥
ऐशा तयांच्या आप्त धर्मा । नाहीं उपमा द्यावया ॥ १३१ ॥

अंगांत नित्याची कफनी । सटका अपुला बगलेस मारूनि ॥
तमाखू आणि चिलीम घेउनी । फडका टाकुनि स्कंधावर ॥ १३२ ॥

बाबा जंव ऐसे तयार । घालिती तात्या अंगावर ॥
जरीकाठी शेला सुंदर । करिती शिरावर सारिखा ॥ १३३ ॥

बाबा मग पाठील भिंती तळीं । असे पडली सर्पणाची मोळी ॥
तदग्रीं दक्षिण पादांगुळीं । हालवीत ते स्थळीं क्षणभर ॥ १३४ ॥

लगेच तेथील जळती जोत । स्वयें मारुनि दक्षिण हात ॥
आधीं साई बुझावीत । मागून निघत चावडीतें ॥ १३५ ॥

साई निघतां जावया । वाद्यें लागत वाजावया ॥
नळे चंद्रजोती हवया । प्रकाशती दिवटिया चौंपासीं ॥ १३६ ॥

कोणी वर्तुल धनुष्याकृती । शिंगें कर्णे तुताऱ्या फुंकिती ॥
कोणी तास झांज वाजविती । नाहीं मिती टाळकरियां ॥ १३७ ॥

मृदंग वीणा झणत्कारीं । साईनामाचिया गजरीं ॥
भजन समवेत हारोहारी । प्रेमें नरनारी चालत ॥ १३८ ॥

दिंडी पताका झेलित । कोणी गरुड टके मिरवित ॥
नाचत उडत भजन करित । निघत मग समस्त जावया ॥ १३९ ॥

अति आनंद सकल लोकां । घेऊनि निघती दिंड्या पताका ॥
ताश तुतारे कर्ण्यांचा दणका । जयकार थयकार बारूचा ॥ १४० ॥

ऐसिया वाजंतरांचे गजरीं । मशीदींतून निघे स्वारी ॥
भालदार देत ललकारी । पायरीवरी बाबा जों ॥ १४१ ॥

टाळ झांज मृदंग मेळीं । कोणी वीणा कोणी चिपळी ॥
भजन करीत भक्तमंडळी । सुख समेळीं तें स्थानीं ॥ १४२ ॥

टके पताका घेउनि करीं । भक्त चालती आनंदनिर्भरीं ॥
दुबाजू दोन चवरधरी । पंखे करीं वीजिती ॥ १४३ ॥

शेले दुशेले एकेरी करिती । पायघड्या मार्गांत अंथरिती ॥
बाबांस हातीं धरोनि चालविती । चवऱ्या ढाळिती तयांवरी ॥ १४४ ॥

तात्याचा वाम हस्त धरी । म्हाळसापती दक्षिण करीं ॥
बापूसाहेब[१] छत्र शिरीं । चालली स्वारी चावडीसी ॥ १४५ ॥
अगाडी घोडा तो ताम्रवर्ण । नाव जयाचें श्यामकर्ण ॥
घुंगुरें झणत्करिती चरण । सर्वाभरण मंडित जो ॥ १४६ ॥
वेत्रपाणी पुढें चालत । साईनामाचा ललकार करित ॥
छत्रधारी छत्र धरित । चवऱ्या वारित चवरधर ॥ १४७ ॥
ताशे वाजंत्रे वाजत । भक्त जयजयकारें गर्जत ॥
ऐस भक्तसंभार चालत । प्रेमें पुकारत भालदार ॥ १४८ ॥
हरिनामाचा एकचि गजर । टाळ झांज मृदंग सुस्वर ॥
सर्व तालावर भक्त संभार । गर्जत ललकारत चालती ॥ १४९ ॥
ऐसा भजनी भक्त संभार । होऊनिया आनंद निर्भर ॥
वाटेनें साईचा जयजयकार । करीत चव्हाट्यावर टाकत तें ॥ १५० ॥
टाळ झांज ढोल घोळ । वाद्यें वाजती अति तुंबळ ॥
साईनामाचा एकचि कल्लोळ । भजन प्रेमळ मौजेचें ॥ १५१ ॥
सर्व चालती नारी नर । सर्व भजनानंदीं निर्भर ॥
करीत साईनामाचा गजर । नादें अंबर कोंदाटे ॥ १५२ ॥
गगन गर्जे वाजंतरीं । प्रेक्षक समुदाय प्रसन्न अंतरीं ॥
ऐसी प्रेक्षणीय चावडीची स्वारी । शोभा साजिरी अनुपम्य ॥ १५३ ॥
अरुण संध्यारागें नभा । जैसी तप्तकांचन प्रभा ॥
तैसी जयाची श्रीमुखशोभा । सन्मुख जैं उभा चावडीच्या ॥ १५४ ॥
ते समयींची ती मुखशोभा । पसरली जणुं बालारुण प्रभा ॥
केवळ चैतन्याचा गाभा । कोण त्या लाभा टाळील ॥ १५५ ॥

१ बापूसाहेब जोग.

धन्य ते समर्थींचें दर्शन । मुखप्रभा आरक्तवर्ण ॥
उत्तराभिमुख एकाग्र मन । करी पाचारण जणुं कोणा ॥ १५६ ॥

ताशे वाजंत्र्यांचा गजर । महाराज आनंद निर्भर ॥
करिती अधोर्ध्व दक्षिणकर । वरचेवर तेथवां ॥ १५७ ॥

रौप्य ताटीं कुसुमनिकर । घेऊन दीक्षितें भक्तप्रवर ॥
पुष्पवृष्टी सर्वांगावर । करीत वरचेवर ते समर्थीं ॥ १५८ ॥

साईचिया मस्तकावरती । गुलाब पुष्पें गुलाल मिश्रिती ॥
काकासाहेब उधळत राहती । प्रेमभक्ती संयुक्त ॥ १५९ ॥

ऐशा जंव त्या पुष्पकळिका । गुलालयुक्त उधळिती काका ॥
तास झांज टाळांचा ठोका । एकचि कडाका वाद्यांचा ॥ १६० ॥

ग्रामलोक बाबांचे भक्त । दर्शना येती प्रीतीयुक्त ॥
मुखचर्या अरुण रक्त । अभिनवसुव्यक्त तेवेळीं ॥ १६१ ॥

पाहोनिया तो तेजविलास । प्रेक्षकनेत्र पावती विकास ॥
प्रेमळां मना होई उल्हास । भवसायास निवृत्ती ॥ १६२ ॥

अहा तें दिव्य तेज अद्भुत । शोभ जैसा बाल भास्वत ॥
सन्मुख ताशे कहाळा गर्जत । उभे राहत बहुसाल ॥ १६३ ॥

करूनि सतत खालीवर । हेलकावीत दक्षिण कर ॥
उदङ्‌ मुख एका स्थळावर । अर्ध प्रहरपर्यंत ॥ १६४ ॥

पीतवर्ण केतकी गाभा । किंचित आरक्त मुखप्रभा ॥
जिव्हा न वर्णूं शकें ती शोभा । नेत्रेंच लाभा सेवावें ॥ १६५ ॥

त्तिकयांत जेव्हां का म्हाळसापती । संचार होऊनि नाचूं लागती ॥
तेव्हां ही बाबांची एकाग्र स्थिती । पाहतां चित्तीं आश्चर्य ॥ १६६ ॥

---

१ काकासाहेब दीक्षित २ सूर्य

दक्षिणांगीं उभा भगत । अंचल बाबांचा करें धरीत ॥
वामांगीं तात्या कोते चालत । घेऊनि हस्तांत कंदील ॥ १६७ ॥

काय मौजेचा तो उत्सव । भक्ति प्रेमाचें तें गौरव ॥
पाहावया तयाचा नवलाव । अमीर उमराव एकवटती ॥ १६८ ॥

निजतेजें धवधवीत । मुखचंद्र सोज्वळ आरक्त ॥
अवर्णनीय शोभा शोभत ॥ स्वानंद पूरित जननयन ॥ १६९ ॥

हळू हळू चालती वाटे । भक्त समुदाय दुबाजू थाटे ॥
अनिवार भक्तिप्रेम दाटे । स्वानंद कोंदाटे घनदाट ॥ १७० ॥

आतां पुढें ऐसा सोहळा । कोणीही पाहूं न सके डोळां ॥
गेले ते दिवस आणि ती वेळा ॥ मनासी विरंगुळा स्मरणेंच॥१७१॥

वाजती वाजंत्रीं अपार । मार्गीं करिती जयजयकार ॥
नेउनि चावडीसी आसनावर । दिव्योपचार अर्पिती ॥ १७२ ॥

वरी बांधीत शुभ्र वितान । हंड्या झुंबरें शोभायमान ॥
आरसां प्रकाश परावर्तन । दैदीप्यमान देखावा ॥ १७३ ॥

भक्त मंडळी सर्व मिळून । चावडीतें जाती जमून ॥
तात्याबा मग घालिती आसन । बाबांस धरून बैसवित ॥ १७४ ॥

ऐसें तें तयार वरासन । पाठीसीं लोडाचें ओठंगण ॥
बाबा होतांच स्थानापन्न । अंगरखा परिधान करवीत ॥ १७५ ॥

घालीत अंगावर दिव्यांबरें । पूजा करीत हर्षनिर्भरें ॥
करीत आरत्या महागजरें । हारतुरे चढवीत ॥ १७६ ॥

सुगंध चंदन चर्चून । करित साईस करोद्वर्तन ॥
पंच वस्त्रीं अलंकारून । मुकुट घालून पाहत ॥ १७७ ॥

---

१ समाधान. २ छत.

कधीं सुवर्ण मुकुट साजिरा । कधीं शिरपेची मंदिल गहिरा ॥
झळके जयावरी कलगी तुरा । कंठी हिरा माणिकें ॥ १७८ ॥

धवल मुक्ताफळांच्या माळा । घालिती मग तयांच्या गळां ॥
दिवावत्तीच्या योगें झळाळा । तेजें आगळा पेहराव ॥ १७९ ॥

सुगंध कस्तूरीरचित काळी । ऊर्ध्वरेषा रेखिती निढळीं ॥
कृष्ण तिलक लाविती भाळीं । वैष्णव कुळीं जेणें परी ॥ १८० ॥

तो जांभळा मखमाली भरजरी । अंगरखा दों खांद्यावरी ॥
हळूच मागून वरचेवरी ॥ सरकतां सावरीत दोबाजू ॥ १८१ ॥

तैसेंच डोईस मुगुटाभरण । अथवा मंदील पालटून ॥
वरिचे वरीच धरीत झेलून । हळूच मागून नकळत ॥ १८२ ॥

हो का मुकूट अथवा मंदिल । स्पर्श होतां फेकून देतील ॥
होती जरी ही चिंता प्रबळ । प्रेमकुतूहल निःसीम ॥ १८३ ॥

साई जो सर्वांतर्ज्ञानी । तो काय नेणे भक्तांची छपवणी ॥
परी तयांचें कौतुक पाहुनी । बुध्याच जाणूनि मौन धरी ॥१८४ ॥

ब्रह्मानुभवें विराजमान । तयास भर्जरी अंगरखा भूषण ॥
निजशांतीनें शोभायमान । तया अलंकरण मुगुटाचें ॥ १८५ ॥

तरीही नानापरीचे सुरुचिर। बाबांस घालिती अलंकार ॥
कपाळीं टिळक मनोहर । रेखिती केशर मिश्रित ॥ १८६ ॥

हिरे मोतियांच्या माळा । कोणी तेथें घालिती गळां ॥
कोणी ललाटीं लाविती टिळा । चालवी लीळा भक्तांच्या ॥ १८७ ॥

शृंगार जेव्हां चढती समस्त । मस्तकीं जैं मुकुट विराजित ॥
मुक्ताहार कंठीं झळकत । दिसे अत्यद्भूत तैं शोभा ॥ १८८ ॥

नानासाहेब निमोणकर । धरीत बाबांवर छत्र पांढुर ॥
काठीं सर्व तें वर्तुलाकार । फिरे झालर सभोंवत ॥ १८९ ॥
बापूसाहेब अति प्रीती । गुरुचरण प्रक्षाळिती ॥
अर्घ्यपाद्यादि भावें अर्पिती । पूजा करिती यथोचित ॥ १९० ॥
पुढें ठेवून रौप्य ताम्हण । तयांत बाबांचे ठेवूनि चरण ॥
अत्यादरें करीत क्षाळण । करोद्वर्तन मागुतें ॥ १९१ ॥
घेऊनि केशराची वाटी । मग लावीत हस्तां उटी ॥
तांबूल अर्पीत करसंपुटीं । प्रसन्न दृष्टी साईंची ॥ १९२ ॥
बाबा जंव गादीस बैसत । तात्याबादि उभेच टाकत ॥
हातीं धरून बाबांस बसवित । आदरें नमित तच्चरणा ॥ १९३ ॥
निर्मळ चावडी भूमिका शुद्ध । घोटीव आणी स्फटिक बद्ध ॥
मिळणी मिळती आबाल वृद्ध । प्रेमें निबद्ध श्रीपदीं ॥ १९४ ॥
होतां गादीवर विराजमान । बसतां तक्यास टेकून ॥
चौरी चामर आंदोलन । वीजिती व्यजन दोबाजू ॥ १९५ ॥
माधवराव तमाखू चुरिती । चिलीम तात्काळ तयार करिती ॥
देती तात्याबांचे हातीं । तात्याबा फुंकीती आरंभीं ॥ १९६ ॥
तमाखूची ज्वाला निघतां । तात्याबा देत बाबांचे हाता ॥
बाबांचा प्रथम झुरका संपतां । मग ती भगतास अर्पीत ॥१९७ ॥
मग ती चिलीम संपे तोंवर । इकडून तिकडे वर्तुलाकार ॥
भगत शामा तात्या बरोबर । वरचेवर भ्रमतसे ॥ १९८ ॥
धन्य ती निर्जीव वस्तू परी । काय तिचीया भाग्याची थोरी ॥
आम्हां सजीवां न तीची सरी । सेवा ती खरी तियेची ॥ १९९ ॥
तपश्चर्या ही महा कठिण । लाथां तुडविलें बाळकपण ॥
पुढें सोसून शीतोष्णतपन । अग्नींत ताऊन निघाली ॥ २०० ॥

मागें बाबांचें करस्पर्शन । पुनश्च भूमीपाशी मर्दन ॥
मागुती गैरिका उटी चर्चन । मुख चुंबन मैं श्याचें ॥ २०१ ॥
असो कर्पूर केशर चंदन । करिती उभयपदां विलेपन ॥
गळां सुमनमाळा घालून । गुच्छावघ्राणन करविती ॥ २०२ ॥
सदां जयाचें सुहास्यवदन । अति सप्रेम सदय अवलोकन ॥
तयास काय श्रृंगाराभिमान । राखिला हा मान भक्तांचा ॥ २०३ ॥
जयां अंगीं भक्तीचीं लेणीं । शृंगारिला जो शांती भूषणीं ॥
तया या लौकिकी माळामणी । अलंकरणीं काय होत ॥ २०४ ॥
कीं जो वैराग्याचा पुतळा । तयास किमर्थ पाचूंच्या माळा ॥
परी अर्पितां ओढवी गळा । भक्तांचा सोहळा पुरवी तो ॥ २०५ ॥
स्वर्ण पाचू दिव्यहार । गळां विराजती मुक्तसर ॥
अष्टाष्ट शोडश जयांचे पदर । अभिनव पुष्कर मिश्रित ॥ २०६ ॥
जाई जुई तुळसी माळा । आपाद जयाचे रुळती गळां ॥
मुक्तकंठा कंठनाळा । मिरवी झळाळा अपूर्व ॥ २०७ ॥
सर्व पाचूचा हेमहार । सुवर्ण पदक हृदयावर ॥
निढळीं शाम तिलक सुंदर । अति मधुर शोभा दे ॥ २०८ ॥
तयास काय म्हणावें फकीर । भासे सतेज वैष्णवप्रवर ॥
वरी ढोलती छत्रचामर । शेला जरतार शिरिं शोभे ॥ २०९ ॥
बहुधा जोग प्रेमनिर्भरीं । मंगलवाद्यांचिया गजरीं ॥
पंचारत घेऊनि करीं । बाबांवरी ओवाळित ॥ २१० ॥
पंचोपचार पूजासमेत । घेऊनि पंचारत धवधवित ॥
नीरांजन कर्पूर वात । ओवाळीत बाबांस ॥ २११ ॥
मग ही आरती जेव्हां संपत । एकेक एकेक सकळ भक्त ॥
बाबांस करोनि साष्टांग प्रणिपात । निघूनि जात घरोघर ॥ २१२ ॥

चिलीम अत्तर गुलाबपाणी । देऊनी बाबांची अनुज्ञा घेऊनी ॥
तात्याबा निघतां जावयां निजसदनीं । म्हणावें बाबांनीं सांभाळ मज ॥
जातोस जा परी रात्रीमाजी । मधून मधून खबर घे माझी ॥
बरें हो म्हणून मग तात्याजी । चावडी त्यजी जाई घरीं ॥ २१४ ॥
ऐसे लोक जातां समस्त । बाबा स्वहस्तें गाठोडें सोडीत ॥
धोतरांच्या घड्या पसरित । स्वहस्तें रचिती निज शेज ॥ २१५ ॥
सांठ पासष्ठ शुभ्र चादरी । घडिया मांडूनिया पुढारी ॥
स्वयें तयांच्या रचूनि हारी । पहुडती वरी मग बाबा ॥ २१६ ॥
ऐसीया चावडीची परी । इत्थंभूत झाली इथवरी ॥
आतां कथा जी राहिली दुसरी । अध्यायांतरीं वर्णिजेल ॥ २१७ ॥
तरी श्रोतां कीजे क्षमा । अगाध या साईचा महिमा ॥
संक्षिप्त वदतां राही न सीमा । गुरुत्वधर्मा पावे तो ॥ २१८ ॥
आतां साईची हंडीची कथा । आणीक ज्या ज्या राहिल्या वार्ता ॥
पुढील अध्यायीं कथीन समस्ता । सादर चित्ता असावें ॥ २१९ ॥
अखंड गुरुस्मरण स्वार्थ । तोच हेमाडा निज परमार्थ ॥
गुरु चरणाभिवंदनें कृतार्थ । चारीही पुरुषार्थ त्यापोटीं ॥ २२० ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । चावडीवर्णनं नाम
सप्तत्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ।